Lokmat, 21 Feb 2017

# पर्यावरणीय समस्यांचे निराकरण गरजेचे

## अश्विनीकुमार नांगिया यांचे मत

पुणे : स्वच्छ भारत अभियानात कचरा व्यवस्थापनासारख्या समस्या आज समाजाला भेडसावत आहेत. त्या सोडविण्यासाठी पावले उचलणे महत्त्वाचे आहे. महत्त्वाच्या पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी 'वापर कमी, पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रिया' हा दृष्टिकोन अवलंबणे गरजेचे आहे, असे मत सीएसआयआर-राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) संचालक प्रा. अश्विनीकुमार नांगिया यांनी व्यक्त केले.

प्लॅस्टिक बाटल्यांच्या पुनर्प्रक्रियेविषयी 'एनसीएल'मार्फत तयार करण्यात आलेल्या www.petrecycling.com या संकेतस्थळाचे अनावरण प्रा. नांगिया यांच्या हस्ते झाले. या वेळी 'पॉलीइथिलिन टेरेफथॅलेट (पेट) बॉटल रिसायकलिंग इन इंडिया' या विषयावर एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात वैज्ञानिक, शिक्षणतज्ज्ञ, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, कचरा विक्रेते आणि पुनर्प्रक्रिया उद्योगातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. संकेतस्थळावर बाटल्यांच्या पुनर्प्रक्रियेविषयी माहिती देण्यात आली आहे.

भारतात पुनर्प्रक्रिया कशा प्रकारे केली जाते, कोण काय करते, किमतीबाबत माहितीची केंद्रे, देशातील पुनर्प्रक्रिया उद्योगांची यादी, बाटल्यांचे उत्पादन-वापर यांचा देशातील कल, प्रत्यक्ष स्थळांना भेटी देतानाचे अहवाल, विविध नियामक पैलू अशी विविध देण्यात आली आहे.

 